# संत जनाबाई

. —सीमा मुसळे

''स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावें उदास। साधुसंतां ऐसें केलें जनीं।।

संतांचे घरची दासी मी अंकिली। विठोबाने दिली प्रेमकळा।।''

अतिशूद्रपण, अनाथपण, दासीपण आणि या सर्वांचे बिरुद घेऊन मिरविणारे स्त्रीपण असे व्यक्तिमत्त्व म्हणजे संत जनाबाई. *संत वाटिकेतील जाईची वेल* अशा उपाधीने नंतरच्या काळात गौरविले असले तरी; समकाळात मात्र यापासून उपेक्षित राहिलेल्या संत जनाबाईंचा 'पहिली शूद्र स्त्रीसंत'(११७) असा उल्लेख इंदुमती शेवडे यांनी केला आहे.

संत जनाबाईंचे जन्मगाव गंगाखेड येथे जनाबाईंचे समाधीमंदिर आहे. तर पंढरपूरजवळील गोपाळपूर येथे जनाबाईचे वास्तव्य होते. तेथे त्यांच्या वास्तव्याची खूण म्हणून जनाबाईंच्या संसाराची मांडणी केली आहे. ताकाचा डेरा, दळणासाठी वापरलेले जाते, चूल, जनाबाईची वाकळ, पाण्याची विहीर अशा गोष्टी दाखविल्या गेल्या आहेत. पण त्या सर्व प्रतिकात्मक आहे. खऱ्या नव्हेत.

जनाबाईंच्या नावावर ३५० इतके अभंग उपलब्ध आहेत. पण ही संख्या सगळीकडे सारखी नाही. सकलसंतगाथेच्या व इतर ग्रंथांच्या वेगवेगळ्या संपादकांनी ही संख्या वेगवेगळी सांगितली आहे.

## संत जनाबाई यांचे चरित्र

संत जनाबाई यांचे चरित्र हे नामदेवांच्या गाथेत समाविष्ट आहे. संत जनाबाईंचे चरित्र हे महिपतीबुवांनी लिहिले आहे. महिपतीबुवाकृत चरित्रानुसार संत जनाबाई यांचा जन्म गोदावरी नदीकाठी वसलेल्या गंगाखेड नावाच्या गावात झाला. हे गाव मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यातील असावे असा निर्वाळा 'सकलसंतगाथा'चे संपादक डॉ.र.रा. गोसावी देतात. तसेच डॉ.सुहासिनी इर्लेकर, इंदुमती शेवडे, राजन गवस, हे.वि.इनामदार ही अभ्यासक मंडळीही या मताची द्विरुक्ती जनाबाईंचे चरित्र लिहिताना करतात. पण त्यांच्या जन्मकाळाची नोंद कोणत्याही पुस्तकात सापडत नाही. पण अनुमानानुसार जनाबाई ह्या सर्व संतमंडळीत जेष्ठ संत ठरतात. कारण संत नामदेव (जन्म: श.११९२—इ.स.१२७०) हे संत ज्ञानेश्वरांपेक्षा वयाने (जन्म: श. ११९७—इ.स.१२७५) मोठे असल्याचा पुरावा त्यांच्या जन्मनोंदीतून सापडतो. तर संत जनाबाई खुद्द आपल्या एका अभंगात नामदेवांच्या जन्माबाबतची नोंद करतात.

गोणाईने नवस केला। देवा पुत्र देई मला।।

शुद्ध देखोनिया भाव। पोटी आले नामदेव।।

दामाशेटी हरुषला। दासी जनीस आनंद झाला।।

याचा अर्थ जनाबाई ह्या नामदेवांपेक्षा वयाने मोठ्या होत. त्या नामदेवांपेक्षा किमान दहा ते बारा वर्षांनी मोठ्या असल्याचे अनेक अभ्यासक सांगतात. यावरून संत जनाबाई ह्या वारकरी संप्रदायातील जेष्ठ आणि श्रेष्ठ स्त्रीसंत कवयित्री होत. परंतु जनाबाईंचा मृत्यूकाल व मृत्यूठिकाण याबाबतची कोणतीही नोंद कोणत्याही ग्रंथात सापडत नाही.

संत जनाबाई यांच्या आईचे नाव करुंड होते तर वडिलांचे नाव दमा होते. हे दोघेही विठ्ठलभक्त होते. जनाबाईंच्या जन्माबाबतची एक आख्यायिका/दंतकथा आहे ज्याचे पुढील आख्यायिका या विभागात स्पष्टीकरण येईल. तर जनाबाईंच्या जन्मानंतर काही वर्षानंतर त्यांना दामाजी शेटीला (नामदेवांचे वडील) अर्पण कर या दमाला झालेल्या विठ्ठलाच्या दृष्टांतानुसार जनाबाईंना नामदेवांच्या घरी पाठविले गेले. त्यानंतर लगेचच जनाबाईंच्या आई करुंड यांचे निधन झाले व काही कालावधीनंतर वडील दमाचे निधन झाले. आणि खऱ्या अर्थाने जनाबाई अनाथ झाल्या. ‘आई मेली बाप मेला। मज सांभाळी विठ्ठला।’ ही आर्त विनवणी या या अनाथपणाच्या जाणीवेतूनच येते. यानंतरचे जनाबाईंचे सगळे आयुष्य नामदेवांच्या घरी गेले. त्या स्वत:ला नामदेवांच्या कुटुंबापासून वेगळे मानत नसत. एका अभंगामध्ये जनाबाई कुटुंबातील चौदा सदस्यांचा उल्लेख झाल्यानंतर *पंधरावी ती दासी जनी* असा करतात.

## संत जनाबाई आणि संत नामदेव

जनाबाई यांच्या आयुष्यातील महत्त्वाची घटना म्हणजे त्यांचे नामदेवांच्या घरी येणे होय. जनाबाईंना अक्षरज्ञान देणारे, त्यांना भक्तीपरंपरेची जाणीव करून देणारे नामदेव होते. त्यामुळे जनाबाईचे—संत जनाबाई या पदापर्यंतचे रूपांतर भक्तशिरोमणी असणाऱ्या नामदेवांच्या सहवासाने झाले.

संत जनाबाईंच्या अनेक अभंगातून नामदेवांबद्दलचे, त्यांच्या कुटुंबाबद्दलचे चरित्रात्मक लेखन झालेले दिसते. यामध्ये नामदेवांच्या जन्मापूर्वी पुत्रप्राप्ती व्हावी म्हणून गोणाईने केलेल्या नवसाचा उल्लेख येतो. नामदेवांच्या सर्व कुटुंबातील सदस्यांचे उल्लेख येतात. तसेच नामदेवांनी आपल्या भक्तीच्या जोरावर विठ्ठलाला प्रसाद चारल्याच्या घटनेचा उल्लेखही येतो. या सर्वामध्ये नामदेवांचा भक्तीमहिमा वर्णन करणारे अनेक अभंगही येतात. या सर्व व्यापातून जनाबाईंना लाभलेल्या नामदेवांच्या सहवासाचे आणि त्या सहवासाने समृद्ध झालेल्या जनाबाईंच्या जीवनजाणीवेचे उच्चारण अनेक अभंगातून होताना दिसते.

आपल्यावर झालेल्या उपकाराची परतफेड जनाबाई जसे शक्य आहे तसे करताना दिसतात.

नामयाचें ठेवणें जनीस लाधलें। धन सापडलें विटेवरी।। (पृ.७३८)

नामदेवांच्या घरी आपले असणे म्हणजे आपल्याला झालेला मोठा लाभ असल्याची खात्री त्या पटवून देतात. तसेच,

''देवा देई गर्भवास। तरीच पुरेल माझी आस।।

परि हे देखा पंढरी। सेवा नामयाचे दारी।।

करी पक्षी का सुकर। श्वान श्वापद मार्जार।।''()

आपल्याला पुन्हा पुन्हा जन्म मिळून नामदेवांची सेवा करायला मिळावी अशी अपेक्षा त्या परमेश्वराकडे व्यक्त करतात. मग तो जन्म पक्षी, डुक्कर, कुत्रा, मांजर असा कुठल्याही प्राणीमात्राचा असला तरी चालेल. नामदेवांची सेवा करत असताना त्या फक्त याच जन्मी दासी झाली आहे असे नाही. तर कित्येक जन्म त्या नामदेवांची दासी असल्याचे सांगतात. प्रल्हादाने जिचा उद्धार केला ती दासी पद्मिनी, रामभक्त अंगदाने विकृत अवस्थेत असणारी व लाथ मारली असता तीचा उद्धार होणारी मंथरा आणि द्वापारयुगातील उद्धवाची सेवा करणारी कुब्जा या सर्व स्त्रिया म्हणजे आपण असल्याचे जनाबाई सांगतात. अनेक युगामध्ये होऊन गेलेल्या या दासी स्त्रिया म्हणजे जनाबाई आणि त्यांचा उद्धार करणारे परमेश्वर म्हणजे नामदेव असल्याचे त्या सांगतात. त्यामुळेच त्या आपल्या बहुतांश अभंगाच्या शेवटी *'नामयाची दासी जनी'* या शब्दातून नामदेवांच्या नावाची गुंफण करतात.जनाबाईंच्या अभंगांची ओळख ही त्यांनी वापरलेल्या या शब्दावलीने होते. तत्कालीन ज्या काही संतांच्या अभंगातून जनाबाईंचा उल्लेख झाला आहे तो 'नामयाची जनी' या नावानेच झालेला आहे. त्यामुळेच जनाबाईंना या शब्दावली म्हणजे स्वत:चा सन्मान वाटतो.

**जनाबाईंच्या अभंगांची प्रेरणा:**

जनाबाईंच्या अभंगात येणाऱ्या 'कष्ट करणाऱ्या' विठ्ठलाचे वर्णन हे खरे की खोटे? अशा पातळीवरील हे प्रश्न आहेत. अर्थात वास्तव जीवनात किंवा शास्त्रीय भाषेत विठ्ठलाला कोणीही जीवस्वरूप असल्याचे पुराव्यासहीत पटवून देऊ शकत नाही. ती फक्त एक दगडाची मूर्ती असा उल्लेख शास्त्रीय भाषेत होईल. पण हीच मूर्ती म्हणजे आपला सोबती, सखा, मदतनीस म्हणून जेव्हा जनाबाई उल्लेख करते तेव्हा इथे एकापेक्षा अनेक पातळ्यांवरून विचार करावा लागतो. संत वाङ्मयाची सबंध परंपरा लक्षात घेतली असता संत ज्ञानेश्वरांपासून संत तुकारामांपर्यंत सर्व संत विठ्ठलाला—परमेश्वराला मानवी पातळीवर आणून मानवी व्यवहार करायला भाग पाडतात. पण इथे खूप कमी वाव चमत्कृतीला दिला आहे. म्हणजे निव्वळ कल्पना आणि चमत्कृती यांच्यावर पोसलेले काव्य अनेक असाध्य, अशक्य गोष्टी काही

वेळातच शक्यतेच्या पातळीवर उतरवतात. पण संतकाव्ये हे कल्पकतेचा वापर करत असले तरी ते अशक्यप्राय कल्पनेच्या भराऱ्या मारण्याचे मात्र आवर्जून टाळतात. भक्ताला खूप वेदना, खूप वाट पाहिल्यानंतर देव प्रकट होतो किंवा त्याला मदत करतो. असे एक सूत्र सर्व संतांच्या काव्यातून दिसते. पुढे असेही दिसते की, केर काढणे, शेणी गोळा करणे, लेखनिक होणे, पाणी भरणे, दळण दळणे ही सामान्य कामे शक्तीशाली परमेश्वर–विठ्ठल एका चुटकीसरशी करू शकला असता. पण असला 'अल्लाऊदीन' संतांना नको आहे. याऊलट मनुष्य ज्या गतीने जी सामान्य कामे करतो त्याच त–हेने ती परमेश्वराला करावयास लावणे हे मानवीकरण खूप समर्थनीय आहे. पण परमेश्वर–विठ्ठल ही कामे खरच करतो का? तर सारासार विचार करून याचे उत्तर 'नाही' असेच येते. मग संत वाङ्मयात अशी विठ्ठलाच्या–मदतनीसाची योजना करण्यामागचे कारण आपल्याला इथे शोधावे लागते.

लोकसाहित्याच्या निर्मितीची कारणे/प्रेरणा अनेक अभ्यासकांनी सांगितली आहेत. त्यामध्ये श्रमपरिहार हे एक महत्त्वाचे कारण/प्रेरणा या निर्मितीमागे सांगितले गेले आहे. श्रमाचा भार हलका होण्यासाठी लोकसाहित्यातील विशेषतः लोकगीतांची निर्मिती होत असते. उदा.दळण दळताना गायल्या जाणाऱ्या ओव्या, भलरी गीते. हीच श्रमपरिहाराची प्रेरणा जनाबाईच्या गीतरचनेच्या मागे दिसते. वारकरी संप्रदायातील सर्व संत हे साधारणतः बहुजन, कष्टकरी वर्गातील आहेत. मातीपासून वस्तू बनविणे, शेतात राबणे यासारखी अनेक बारा बलुतेदारी पद्धतीची कामे ही संतमंडळी करतात. त्यामुळे त्यांच्या रचनेच्या मागे या प्रेरणेचे तत्त्व सापडते. जनाबाईच्या अनेक अभंगातून येणारे कामांचे संदर्भ हे या प्रेरणेचे सूचन करतात.

तसेच केवळ कलानिर्मिती ही जनाबाईच्या अभंगाची प्रेरणा नव्हती तर त्याहीपेक्षा वेगळ्या प्रेरणा त्यांच्या अभंगाच्या गाभ्यात होत्या. यातील दुसरी महत्त्वाची म्हणजे स्वतःच्या दुःखाचे प्रकटीकरण करणे ही एक. जणाबाईंना जीवाभावाची अशी कोणीही व्यक्ती नव्हती त्यामुळे शारीरिक मानसिक कष्टाचे, दुःखाचे, पोरकेपणाचे–अनाथपणाचे दुःख व्यक्त करण्याचे एकमेव माध्यम म्हणजे अभंग होते. ज्याद्वारे जनाबाई आपल्या दुःखांना वाट मोकळी करून देत होत्या. दुसरी महत्त्वाची म्हणजे विठ्ठलभक्ती. विठ्ठलाबद्दलच्या अपार भक्तीचा उच्चार त्यांना या अभंगातून करता येत होता. स्त्री म्हणून मिळालेल्या दुय्यम भावामुळे इतर संतांप्रमाणे इच्छा असूनही त्यांना मंदिरात जास्त वेळ थांबता येत नव्हते. (जनाबाईवर घेतलेल्या पदक चोरीच्या आरोपामुळे मंदिरातील त्यांचा वावर आणखीन कमी झाला असावा.) तसेच नवसृजनशील भावनेची एक लय त्यांच्या व्यक्तिमत्त्वात उपजतच असावी आणि अभंग हे अभिव्यक्तीचे असे माध्यम होते की जिथे त्यांना कोणी अटकाव करू शकत नव्हते. या सर्व गोष्टींच्या मिश्रणाचे साफल्य त्यांच्या अभंगात झाल्याचे दिसते. कुठलीतरी बिदागी मिळणार आहे किंवा प्रसिद्धी मिळणार आहे म्हणून जनाबाई लिहीत नाहीत. उलट त्या कालखंडात जनाबाईच्या अभंगांची

कुणीही दाद घेतलेली दिसतही नाही. त्यांच्या लिखाणाबद्दल टर उडविण्याचा एक संदर्भही त्यांच्या अभंगात येतो.

मग हांसोनि सकळी । पाहू देव कैसा बळी।।

आले नामदेवा घरी। प्रेमे भुललसी हरी।।

घाली जातियासी वैरण। गाय आवडीचे गाणे।।

त्यामुळे श्रमपरिहार करण्यातून तसेच स्वतःच्या दुःखाचे, अनुभवांचे आणि विठ्ठलभक्तीचे प्रकटन अशा काही नैसर्गिक प्रेरणा जनाबाईंच्या अभंगाच्या निर्मितीमागे असल्याचे दिसते.

**भक्तीसाधना:**

जनाबाईच्या भक्तीसाधनेची रीत निराळी आहे. हातात टाळ–विणा घेऊन जनाबाई भक्तीची उपासना करत नाहीत. किंबहुना त्यांना तितका वेळही नाही. याऊलट त्यांचे दोन्ही हात सतत कामात गुंतलेले आहे. या कामाच्या रगाड्यात विठ्ठलासाठी असा निवांत वेळ त्यांच्याकडे नाही. भक्तीसाधनेसाठी त्या नामस्मरणाची साधी पद्धत अवलंबितात. ''नाम फुकट चोखट। नाम घेतां नये वीट।। वाचें नाम विठ्ठलाचें। तेणें सार्थक देहाचें।। किंवा ''नाम विठोबाचें घ्यावें। मग पाऊल टाकावें। नाम तारक हें थोर। नामें तरिले अपार।।''(पृ.७१६) म्हणजे भक्ती ही कोणत्याही दगडाच्या देवाची पूजाअर्चा करून किंवा नवस–सायास करून होत नाही. तर देवाबद्दलचा मनातील भाव महत्त्वाचा आहे. म्हणून जनाबाई म्हणतात,

दळिता कांडिता। तुज गाईन अनंता।। १।।

न विसंबे क्षणभरी। तुझें नाम गा मुरारी ।।२।।

आपल्या भक्तीउपासनेत त्यांना कधीच कामाचा अडसर वाटत नाही. उलट प्रत्येक काम करताना सख्या विठ्ठलाची त्यांना असणारी सोबत अलौकिक आहे. त्यामुळे या कामाचे ओझेही सहज पेलवले जाते अशी त्यांची भावना आहे. यामुळेच जनाबाईंच्या कित्येक अभंगात त्या करत असलेल्या कामाचे संदर्भ सापडतात. पाणी भरणे, धान्य दळणे, कांडणे, शेणी गोळा करणे, कपडे धुणे अशी एक ना अनेक कामे त्यांच्या अभंगाचा एक अविभाज्य भाग आहे. 'लेखक/कवी ज्या परिसरात जगतो, वाढतो त्या परिसराचे रेखाटन साहित्यातून–शब्दरूपातून होत असते' या साहित्यिक विधानाचा प्रत्यय जनाबाईंच्या या अभंगातून होत राहतो. इथे स्वानुभवातून जाणवलेल्या, नैसर्गिक भक्तिमार्गाचा अवलंब होताना दिसतो. विधी, कर्मकांड तर दूरच, निव्वळ विठ्ठलासाठी वेळ काढणं हे देखील अस्वाभाविक वाटल्यानं जनाबाई स्वाभाविक अशा नामगजराचा वापर करतात.

विठ्ठल आणि आपण हे वेगळे नसून एक आहोत असा सूर जनाबाईंच्या अनेक अभंगातून आळविला जातो. विठ्ठलाचे अस्तित्व जसे भक्तांशिवाय नाही तसेच आपलेही अस्तित्व विठ्ठलाशिवाय नसल्याचे त्या सांगतात. त्या म्हणतात,

देव खाते देव पिते। देवावरी मी निजतें।।

देव देते देव घेते। देवासवे व्यवहारितें।।

देव येथें देव तेथें। देवाविणें नाहीं रितें।।

जनी म्हणे विठाबाई। भरूनि उरलें अंतरबाही।।

अंतर्बाहय विठ्ठलमय होऊन गेलेल्या जनाबाई म्हणतात, की माझ्या खाणं–पिणं, देण्या–घेण्याचा व्यवहार विठ्ठलाशीच होतो आहे. अशा सर्वव्यापी असलेल्या विठ्ठलाचे अस्तित्व आपल्यातही भरून उरल्याचे त्या सांगतात. पण जेव्हा जनाबाई विठ्ठाची आर्त विनवणी करतात तेव्हा विठ्ठल ती ऐकून घेत नाही. मग मात्र जनाबाई या विठ्ठलाला आपल्या हृदयाच्या बंधिखान्यात कोंडून ठेवतात, त्याच्या पायात बेडी घालतात, त्याच्यावर शब्दाचा मारा करतात. कोंडलेल्या अवस्थेत विठ्ठल जेव्हा काकुळतीला येतो तेव्हाही त्या त्याला न सोडण्याचे वचन बोलतात.

धरिला पंढरीचा चोर। गळां बांधोनिया दोर।।

हृदय बंदिखाना केला। आंत विठ्ठल कोंडिला।।

शब्दें केली जवाजुडी। विठ्ठल पायीं घातली बेडी।।

सेहं शब्दाचा मारा केला। विठ्ठल काकुळती आला।।

जनी म्हणें बा विठ्ठला। जीवेम न सोडी मी तुला।।

जनाबाईंच्या काही महत्त्वाच्या अभंगामध्ये लयबद्धतेने सजलेला हा अभंग आहे. अर्थाला रूपकातून मांडण्याची जनाबाईंच्या अभंगाची ही अविट गोडी या अभंगातून चाखायला मिळते. आपल्या भक्तीची ऐवढी ताकत आहे की आपण आपल्या विठ्ठलाला कोंडून ठेवू शकतो असा विश्वास त्यांना आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**


१. इंदुमती शेवडे : संत कवयित्री,

२. डॉ.र.रा. गोसावी.संपा. : सकलसंतगाथा